# कोर्स वार्षिक वेळापत्रक

| अ.नं. | कोर्सचे नाव | कालावधी | कोर्स सुरु होण्याची दिनांक | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|---|
| १ | डिप्लोमा इन बेसिक रुरल टेक्नॉलॉजी | २ वर्ष | १५ जून | ६० |
| २ | वेल्डर | १ वर्ष | १५ जून ते ३१ मे | २० |
| 3 | इलेक्ट्रिशियन | १ वर्ष | १५ जून ते ३१ मे | २० |
| ४ | वेल्डिंग फॅब्रीकेषण | ३ महिने | १५ जून ते १० सप्टें.<br>११सप्टें. ते १०डिसें.<br>११ डिसें. ते ५ मार्च<br>६ मार्च ते ३ मे | २० |
| ५ | इलेक्ट्रीक मोटर रिवायंडिंग | ३ महिने | १५ जून ते १० सप्टें.<br>११सप्टें. ते १०डिसें.<br>११ डिसें. ते ५ मार्च<br>६ मार्च ते ३ मे | २० |
| ६ | प्लंबर | ३ महिने | १५ जून ते १० सप्टें.<br>११सप्टें. ते १०डिसें.<br>११ डिसें. ते ५ मार्च<br>६ मार्च ते ३ मे | २० |
| ७ | मुलभूत संगणक | १ महिना | प्रत्येक महिन्याची १ तारीख | ३० |
| ८ | एक्सट्रूडर मशीन ऑपरेटर | ६ महिने | १ जुलै , १ जानेवारी | ३० |
| ९ | टेलरिंग | ३ महिने | १५ जून ते १० सप्टें.<br>११सप्टें. ते १०डिसें.<br>११ डिसें. ते ५ मार्च<br>६ मार्च ते ३ मे | ३५ |





'We are the shapers of Rural Entrepreneurs'



"Skilling is building a better India. If we have to move India towards development then Skill Development should be our mission."

*SKILL INDIA* भारत सरकार द्वारा 'प्रशिक्षण भागीदार' ( *TRAINING PARTNER* ) मान्यताप्राप्त संस्था
रजिस्ट्रेशन क्रमांक - *TP107693*

Skill India
कौशल भारत - कुशल भारत
Government of India Scheme
Skill India
कुशल भारत

राष्ट्रीय मुक्त विद्यालयी शिक्षा संस्थान
National Institute of Open Schooling
(The Largest Open Schooling System in the World)

सत्यमेव जयते
GOVERNMENT OF INDIA
MINISTRY OF SKILL DEVELOPMENT & ENTREPRENEURSHIP

N·S·D·C
National Skill Development Corporation
Transforming the skill landscape


प्रवेशासाठी अथवा अधिक माहितीसाठी संपर्क क्रमांक

आनंद गोसावी ( प्राचार्य )- 9960865463
सुनिल दळवी (प्रवेश विभाग) - 9145218604
विठ्ठल नारागुडे (प्रवेश विभाग) - 8788056951
विनोद सांबरे (प्रवेश विभाग) - 8208157807


GOVARDHAN
SKILL CENTRE

# गोवर्धन कौशल्य केंद्र
# GOVARDHAN SKILL CENTRE




# माहितीपत्रक




संस्थेचा पत्ता
**गोवर्धन कौशल्य केंद्र,**
गालतरे, पोस्ट.- हमरापूर, ता.- वाडा , जिल्हा- पालघर ४२१३०३

## संस्थेचा परिचय व भूमिका

'गोवर्धन कौशल्य केंद्र वर्ष २०१६ पासून पालघर जिल्ह्यातील ग्रामीण समुदायांना अर्थपूर्ण व उद्देशपूर्ण जीवन जगण्यासाठी दर्जेदार शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण, आरोग्यसेवा व नैतिक मुल्ये यांच्या माध्यमातून कौशल्य प्रशिक्षणाद्वारे शाश्वत उपजीविकेसाठी गावांचा विकास करून खेड्यांना स्वयंपूर्ण बनविण्यासाठी कौशल्य प्रशिक्षण व जीवनाभिमुख सेवा देण्याचे काम करत आहे.

राष्ट्राच्या विकासात ग्रामीण समाज उल्लेखनीय कामगिरी बजावीत असतो. अन्नधान्ये व इतर कच्चा माल यांचे उत्पादन ग्रामीण भागातच होत असते. नैसर्गिक साधनसंपत्ती बहुतांशी ग्रामीण प्रदेशातच उपलब्ध होते. भारतासारख्या विकसनशील राष्ट्रांना तर ग्रामीण विकासाची गरज फारच तीव्रतेने भासते.

गोवर्धन कौशल्य केंद्र ग्रामीण युवकांना कौशल्य प्रशिक्षण देवून त्यांनी गावोगावी उद्योग व्यवसाय सरू करावे यासाठी प्रशिक्षित करत आहे. उत्पादक काम व ज्ञान यांचा समवाय साधून कार्यकेद्रित शिक्षण पद्धती द्वारे विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केले जाते. ग्रामीण भागाच्या विकासास आवश्यक घटकांचा अभ्यासक्रमात समावेश करून विविध कोर्स संस्थेद्वारे शिकविले जातात.

तसेच ग्रामीण भागातील शाळांतील शिक्षणाचा दर्जा उंचाविण्यासाठी व पायाभूत शालेय शिक्षण अधिक गुणवत्तापूर्ण करण्यासाठी संस्थेद्वारे पालघर जिल्ह्यातील २१ अंगणवाडी व ८ जिल्हापरिषद शाळांसोबत शैक्षणिक गुणवत्ता वाढीचे काम करत आहोत.

## संस्थेची पायाभूत तत्वे

गोवर्धन कौशल्य केंद्र खालील मुलभूत तत्वांशी कटिबद्ध आहे.

- हाताने काम करत करत शिकणे.
- कार्यकेंद्रित शिक्षण पद्धतीचा अवलंब.
- बहुविध कौशल्य प्रशिक्षण.
- ग्रामीण विकासाधारित अभ्यासक्रम.

## संस्थेची वैशिष्ठे

- प्रशस्त इमारत व अत्याधुनिक कार्यशाळा
- अनुभवी व उच्यशिक्षित शिक्षकवृंद
- भरपूर प्रात्यक्षिक व कौशल्यांचा सराव
- सुसज्य वसतीगृह व्यवस्था उपलब्ध
- मुलींसाठी स्वतंत्र वसतीगृह व्यवस्था
- मोफत गणवेश
- कोर्स पूर्ण केल्यानंतर लगेच १००% इंटर्नशिप
- एस सी / एस टी प्रवर्गासाठी विशेष सवलत

## संस्थेचे प्रकल्प

गोवर्धन कौशल्य केंद्राद्वारे खालील मुख्य विभाग कार्यरत आहेत .

१. कौशल्य प्रशिक्षण विभाग .
२. महिला सशक्तीकरण विभाग.
३. शालेय शिक्षण व तंत्रशिक्षण विभाग .
४. अंगणवाडी व जिल्हा परिषद शैक्षणिक विकास विभाग .
५. गो आधारित उत्पादने विभाग
६ . मसाले ,लोणची प्रक्रिया व उत्पादन विभाग

## संस्थेतील कोर्सेसची माहिती

### १. मुलभूत ग्रामीण तंत्रज्ञान पदविका अभ्यासक्रम
### *Diploma in Basic Rural Technology*

हा संस्थेतील मुख्य अभ्यासक्रम आहे. 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओपन स्कूलिंग' (भारत सरकार), नवी दिल्ली या जगातील सर्वात मोठ्या मुक्त विद्यापीठाचा हा अभ्यासक्रम असून संस्था वर्ष २०१६-१७ पासून यशस्वीपणे सदर अभ्यासक्रम राबवत आहोत. या अभ्यासक्रमाचा कालावधी दोन वर्ष असून यातील एक वर्ष निवासी प्रशिक्षण तर एक वर्ष प्रत्यक्ष उद्योग क्षेत्रात इंटर्नशिप असे स्वरूप आहे.

७०% प्रात्यक्षिकाद्वारे प्रशिक्षण व ३०% थेअरी अभ्यासक्रमाद्वारे वेल्डिंग, इलेक्ट्रीक, शेती, अन्नप्राक्रिया, संगणक या विभागातील विविध ७५ कौशल्यांचे प्रशिक्षण हे या कोर्सद्वारे दिले जाते. आपला स्वतंत्र उद्योग उभारू इच्छिणाऱ्या युवकांसाठी हा कोर्स अतिशय उपयोगी आहे. तसेच ज्यांना हाताने काम करत शिकणे आवडते, केवळ पुस्तकी शिक्षण घेणे नको असते, अशा विद्यार्थ्यांसाठी हा कोर्स अतिशय उपयोगी आहे. हा केवळ व्यवसाय शिक्षण देणारा अभ्यासक्रम नसून युवकांना स्वतःच्या पायावर उभे राहून उद्योग करण्याची क्षमता, आत्मविश्वास व प्रेरणा देणारा एकमेव अभ्यासक्रम आहे. 'उत्पादक कामातून शिक्षण' या संकल्पनेवर आधारित शिक्षण पद्धतीद्वारे हा कोर्स शिकविला जातो. स्वतःतील कलागुण ओळखून आपल्या जीवनाला आकार देवू इच्छिणाऱ्या नवयुवकांसाठी हा बहुकौशल्यीय अभ्यासक्रम अतिशय उपयोगी आहे.

**कोर्स कालावधी** - २ वर्ष ( एक वर्ष प्रशिक्षण + एक वर्ष कंपनीत अनुभव)
( १५ जून ते ३० मे )

**शैक्षणिक पात्रता** - एस एस सी पास / नापास ,

**वयोमर्यादा** - १७ वर्ष पूर्ण व वय वर्ष 25 पर्यंत

**कोर्स नंतर संधी** - एक वर्ष प्रत्यक्ष शिक्षण झाल्यानंतर पुढील वर्षी कंपनीत इंटर्नशिप ( या एक वर्षात कंपनीकडून विद्यावेतन मिळते) त्यानंतर कंपनीत नोकरी अथवा स्वतःचा व्यवसाय सुरु करू शकता.

या अभ्यासक्रमास मुलगा व मुलगी दोघेही प्रवेश घेवू शकतात.

### २. वेल्डिंग टेक्नॉलॉजी- *Welding Technology*

आर्क वेल्डिंग, $CO_2$ वेल्डिंग, गॅस वेल्डिंग, फेब्रीकेषण, इस्टीमेशन, थ्रेडिंग, मापन, कटिंग फायलिंग, पेंटिंग इ. प्रात्यक्षिकांद्वारे भरपूर सरावासह प्रशिक्षण. या अभ्यासक्रमाचा कालावधी एक वर्ष असून सहा महिने प्रत्यक्ष प्रशिक्षण व पुढील सहा महिने कंपनीत इंटर्नशीप असे कोर्स चे स्वरूप आहे. इंटर्नशीप दरम्यान विद्यार्थ्यास विद्यावेतन दिले जाते.

### ३. इलेक्ट्रिक टेक्नीशियन - *Electric Technician*

घरघुती वायरिंग, मुलभूत औद्योगिक वायरिंग, घरघुती विद्युत उपकरणे दुरुस्ती, मोटार रिवायडिंग, इ. कौशल्ये या अभ्यासक्रमात शिकविले जातात. या अभ्यासक्रमाचा कालावधी एक वर्ष असून सहा महिने प्रात्यक्षिक प्रशिक्षण व पुढील सहा महिने कंपनीत इंटर्नशीप असे कोर्स चे स्वरूप आहे. इंटर्नशीप दरम्यान विद्यार्थ्यास विद्यावेतन दिले जाते.

### ४. प्लंबर - *Plumber*

प्लंबिंग व्यवसायाची वाढती गरज लक्षात घेता हा कोर्स शिकविला जातो. बांधकाम व्यवसायात प्लंबिंग हा एक मुख्य घटक आहे. हा सहा महिन्याचा स्वयंरोजगाराभिमुख अभ्यासक्रम आहे. तीन महिने प्रशिक्षण व तीन महिने प्रत्यक्ष काम असे कोर्स चे स्वरूप आहे .

### ५. संगणक प्रशिक्षण - *computer courses*

सध्याच्या कम्प्युटरच्या युगात जवळ-जवळ सर्वच ठिकाणी वेगवेगळ्या कामांसाठी कॉम्प्युटरचा वापर केला जातो. पण ही सर्व कामे करण्यासाठी वेगवेगळ्या सॉफ्टवेअरची आणि त्या सॉफ्टवेअर बद्दल चांगली माहिती असणाऱ्या व्यक्तींची गरज असते. याबद्दल माहिती करून घेण्यासाठी किंवा या सॉफ्टवेअर वापरणे शिकण्यासाठी आपल्याला काही विशिष्ट प्रकारचे कोर्सेस करावे लागतात. कॉम्प्युटर संबंधित बेसिक ते अँडव्हांस असे अनेक कोर्सेस संस्थेत शिकविले जातात.

## महिला सशक्तीकरण विभाग

**१. टेलरिंग कोर्स** - तीन महिने कालावधी *(३४० तास)*

**२. ब्युटी पार्लर प्रशिक्षण** *:* १ महिना ते ३ महिने
*(मेहंदी,आयब्रो, फेशियल, मेकअप, इ. कौश्यल्यानुसार कालावधी असेल )*

**३. आरोग्य आश्रय सेविका कोर्स** - एक महिना कालावधी

**४. महिला बचत गट कौशल्य प्रशिक्षण वर्ग** -
या प्रशिक्षण वर्गात ग्रामीण महिलांना खाद्य पदार्थ निर्मिती व संरक्षण, हस्तकला , गोधारित वस्तू निर्माण प्रशिक्षण, तसेच स्वयंरोजगार निर्मिती पूरक कौशल्ये प्रशिक्षण दिले जाते. या कोर्सेसचा कालावधी २ दिवसांपासून ३ महिन्यापर्यत आहे. सदर कोर्स महिला बचत गट सदस्य व गटाने प्रवेश घेतल्यास शिकविले जातात .